# प्रेसनोट

चाळीसगाव ग्रामीण पो.स्टे.
जावक क्र. /2025
दिनांक 17/06/2025

प्रति,

मा. संपादक,

...............................................

विषय :- वृत्तपत्रात प्रसिद्धी होणे बाबत...

--- 000 ---

चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशन गु.रजि.नं. 156/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2), 3(5) प्रमाणे दिनांक 19/05/2025 रोजी दाखल आहे. दिनांक 19/05/2025 रोजी रात्री 01.00 वाजेच्या सुमारास सदर गुन्ह्यातील फिर्यादी नारायण बाळासाहेब तिकांडे वय- 46 वर्षे, धंदा- शेती, रा. शिंदी, ता. चाळीसगाव यांची खराडी, ता. चाळीसगाव शिवारातील शेत गट नं. 23/3/ड/अ मधील राहते घराबाहेर बांधलेल्या बकऱ्या ह्या तीन अनोळखी चोरटे चोरुन घेत जात असतांना फिर्यादी यांना बकऱ्यांचा आवाज आला त्यामुळे फिर्यादी हे झोपेतुन उठले व त्या अनोळखी आरोपीतांचा पाठलाग करत असतांना हिरापुर, ता. चाळीसगाव पकडले असता तीन्ही अनोळखी आरोपी हे त्यांचे ताब्यातील बकऱ्यांनी भरलेली ग्रे कलरची ह्युंडाई सँट्रो गाडी क्र. MH01NA558 हि गाडी जागीच सोडुन पळुन गेले. सदरच्या चारचाकी गाडीमध्ये एकुण 08 बकऱ्या मिळुन आल्या त्यामध्ये फिर्यादी यांच्या तीन बकऱ्या व इतर सुद्धा बकऱ्या होत्या. त्याबाबत फिर्यादी तिकांडे वय- 46 वर्षे, धंदा- शेती, रा. शिंदी, ता. चाळीसगाव यांची खराडी, ता. चाळीसगाव यांनी दिलेल्या फिर्यादी फिर्यादवरुन वरप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास मा. पोलीस अधिक्षक श्री. महेश्वर रेड्डी सो., तसेच मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती कविता नेरकर सो. व मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. धनंजय वेरुळे सो. यांचे मार्गदर्शनाप्रमाणे चाळीसगाव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार, पो.उपनिरी. श्री. कुणाल चव्हाण, पो.उनिरी. श्री. राहुल राजपुत, सहा.पो.उपनिरी. 2605 युवराज नाईक, पो.हे.कॉ. 894 रविंद्र रावते, पो.हे.कॉ. 2961 प्रविण संगेले, पो.हे.कॉ. 287 नितीन सोनवणे, पो.हे.कॉ. 172 संदीप पाटील, पो.हे.कॉ. 412 अकरम बेग, पो.ना. 2324 भगवान माळी, पो.कॉ. 1465 सुनिल पाटील, पो.कॉ. 3436 प्रदीप पवार अशांनी तांत्रिक विश्लेषणाचे आधारे सदर गुन्ह्यातील अनोळखी आरोपी निष्पन्न करुन 1) शांतराम उर्फ जिभ्या सुकलाल गायकवाड वय-29 वर्षे, रा. पिंपरखेड, ता. भडगाव, 2) अमोल महादु मालचे वय- 22 वर्षे, रा. यशवंत नगर, भडगाव, 3) सुनिल बापु देवरे (भील) वय- 23 वर्षे, रा. लोणी सीम, ता. पारोळा अशांचा शोध घेवुन त्यांना वरील गुन्ह्याकामी अटक केली असता नमुद आरोपीतांनी चाळीसगाव तालुका व जवळपासच्या परिसरात तसेच जळगाव, धुळे, मालेगाव, नंदुरबार, संभाजीनगर ग्रामीण परिसरात सुद्धा अशाच प्रकारे बकऱ्या चोरीसारखे बरेच गुन्हे केल्याचे कबुल केले आहे. त्याबाबत मा. पोलीस निरीक्षक सो. यांचे आदेशाने पुढील सखोल तपास पो.ना. 2324 भगवान माळी हे करीत आहेत.

राहुलकुमार द. पवार
पोलीस निरीक्षक
चाळीसगांव ग्रामीण पो.स्टे.



चाळीसगांव ग्रामीण पोलीस
जिल्हा.जळगांव